आदिनाथो

हरिर्ब्रह्मा

वशिष्ठो

रामभारतौ



समर्थः
श्रीधरश्चैव

पृथिराजो हि सुव्रतः

।। गुरुगीता ।।

मराठी पद्यानुवाद

शशिकांत कोंडेजकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

-गुरूगीता-

मूळ संस्कृतसह मराठी श्लोकमय

अनुवाद-श्री. शशिकांत भगवान कोंडेजकर

-गुरूगीता मराठी समश्लोकी

अनुवाद : शशिकांत भगवान कोंडेजकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

१३ ऑगस्ट २०२६

©esahity Pratishthan®2026

•विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

•आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

•हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत

काही वर्षापासून संस्कृत स्तोत्र पाठ समजून घेण्याचा छंद लागला होता. मुळात ही गीर्वाण भाषा फारच जुजबी समजत असल्याने जिथून मिळेल तिथून मराठीत अर्थ छापलेला असेल त्यातून पहात आहे. बऱ्याच पुस्तिका अर्थ देतात. त्यामुळे त्यांचे आपल्या भाषेत समान अर्थी रचना करण्याचा प्रयत्न करतो. यापूर्वी काही कवच स्तोत्रे यांची समश्लोकी केली. कितीतरी काळापासून गीता प्रेस खूप धार्मिक पुस्तकांचे अर्थासह प्रकाशन करीत आहे. हल्ली विकिपिडिया आणि इतर अन्य माध्यमांवर भाषांतरे सहज उपलब्ध असतात. भगवद्गीतेचीही

समश्लोकी केली आहे. या सर्व अनुवादांना श्री. सुनीळ सामंत सरांनी प्रसिध्दी दिली आहे. त्यांच्याच अधिपत्याखालील या ईसाहित्य (eSahity.com) वर त्या पुस्तिका त्यांनी ठेवल्या आहेत. आता हा गुरुगीतेचा अनुवाद मला विकिपीडियावर जेवढा मिळाला त्या अर्थाप्रमाणे मराठी पद्यात केला आहे. तो आपणास आवडावा असे वाटते आहे. यात काही चुकले असेल तर सुधारणा अवश्य सुचवाव्यात ही नम्र विनंती.

श.भ.कोंडेजकर

।। गुरुगीता ।।

आदिनाथ, हरि, ब्रह्मा, वशिष्ठ, राम, मारुती, समर्थ, श्रीधर अशा गुरु परंपरेतील परमहंस परिव्राजक सद्गुरू श्री पृथ्वीराज भालेराव उपाख्य सुव्रतस्वामी यांच्याच कृपेने हा पद्यानुवाद झाला आहे. परमहंस सद्गुरू श्री पृथ्वीराज भालेराव सुव्रत स्वामी यांच्या प्रभावामुळे हे लेखन झाले आहे. त्यांना कोटी कोटी वंदन !

विकिपिडियावर सार्थ गुरुगीता जेवढी उपलब्ध आहे तिच्या आधाराने गुरुगीतेतील श्लोकांचा अनुवाद आपणासाठी सादर करीत आहे. तो गोड मानून घ्यावा.

(हा श्रीजगद्गुरु श्रीशंकर आणि जगन्माता पार्वतीदेवी ह्यांचा सिद्ध-साधक स्वरूपातील संवाद आहे. याद्वारे त्यांनी जगाला मोक्षाचा मार्ग समजावून दिला आहे.)

सूत उवाच ।

कैलासशिखरे रम्ये, भक्तिसंधान-नायकम् ।

प्रणम्य पार्वती भक्त्या, शंकरं पर्युपृच्छत ॥१॥

सूत म्हणे

मनोरम कैलास शिखरी, श्रीशंकर तेथ वास करी ।

भक्तीसाधन जो विवरी, पार्वती भक्तीने तया विचारी ।।१।।

श्रीदेव्युवाच ।

ॐ नमो देवदेवेश, परात्पर जगद्गुरो ।

सदाशिव महादेव, गुरुदीक्षां प्रदेहि मे ॥२॥

श्रीदेवी म्हणे

ॐकारा देवांच्या देवा, जगताच्या गुरुदेवा ।

सर्वदा शिवस्वरूपा देवा, अनुग्रह मज द्यावा ।।२।

केन मार्गेन भो स्वामिन्, देही ब्रह्ममयो भवेत् ।

त्वं कृपां कुरु मे स्वामिन्, नमामि चरणौ तव ॥३॥

कोणत्या मार्गाने स्वामी, देह पावेल त्या ब्रह्मी ।

स्वामी कृपा करा तुम्ही, आपल्या पदी लीन मी ।।३।।

ईश्वर उवाच ।

ममरूपासि देवी त्वं, त्वत्प्रीत्यर्थं वदाम्यहम् ।

लोकोपकारकः प्रश्नो, न केनापि कृतः पुरा ॥४॥

ईश्वर वदती ।

प्रश्न हा उपकारक जगा, पूर्वी न केला कोणी अगा ।

तूचि मत्स्वरूपा जाण गा, कथितो तुजसाठी गा ।।४।।

दुर्लभं त्रिषु लोकेषु, तच्छृणुष्व वदाम्यहम् ।
गुरुं विना ब्रह्म नान्यत्, सत्यं सत्यं वरानने ॥५॥

तिन्ही लोकी दुर्लभ पाही, तेचि सत्य सर्व काही ।
देवी पार्वती तू पाही, गुरूविना दुजे ब्रह्म नाही ।।५।।

वेदशास्त्रपुराणानि इतिहासादिकानि च ।
मंत्रयंत्रादिविद्याश्च, स्मृतिरुच्चाटनादिकम् ॥६॥

अभ्यासली जरी कितीही, इतिहास पुराण शास्त्रे ।
आचारली तप साधना, किंवा तीर्थ यंत्र मंत्रे ।।६।।

शैवशाक्तागमादीनि, अन्यानि विविधानि च ।

अपभ्रंशकराणीह, जीवानां भ्रांतचेतसाम् ॥७॥

पंथ शैव शाक्त, विविध पंथांचे भक्त ।

हे जिवाला करिती भ्रांत, भ्रमविण्या कारणीभूत ।।७।।

यज्ञो अनेक व्रतं तपो दानं, जपस्तीर्थं तथैव च ।

गुरुतत्त्वमविज्ञाय, मूढास्ते चरन्ति जनाः ॥८॥

यज्ञ जप तपश्चरण, दान तप तीर्थाटन ।

गुरुतत्त्वाचे नसता ज्ञान, ते मूर्खपणाचे वर्तन ।।८।।

गुरुबुद्धयात्मनो नान्यत् सत्यं सत्यं न संशयः ।

तल्लाभार्थ प्रयत्नस्तु, कर्तव्यो ही मनीषिभिः ॥९॥

बुध्दिरूप आत्मा हाच, गुरूरूप जाणा साच ।

तयाच्या लाभाची आच, कर्तव्यपथ खरा हाच ।।९।।

गूढविद्या जगन्माया, देहे चाज्ञानसंभवा ।

उदयः स्वप्रकाशेन, गुरुशब्देन कथ्यते ॥१०॥

देही आपुल्या अज्ञानवशे, गुप्तविद्यारूपे माया वसे ।

जाणा गुरुशब्दे स्वयंप्रकाशे, मायाविलये आत्मज्ञान प्रकाशे ।।१०।।

सर्वपापविशुद्धात्मा, श्रीगुरोः पादसेवनात् ।

देही ब्रह्म भवेद्यस्मात्, तत्कृपार्थं वदामि तत् (ते) ॥११॥

अंतःकरणाची पापातून शुध्दता, गुरुचरणाची सेवा करिता ।

जये देहा मिळे ब्रह्मस्वरूपता, कथितो ते गुरुतत्त्व कृपेकरिता ।।११।।

गुरुपादांबुजं स्मृत्वा, जलं शिरसि धारयेत् ।

सर्वतीर्थावगाहस्य, संप्राप्नोति फलं नरः ॥१२॥

गुरुपदकमल मनी स्मरता, शिरी जेव्हा स्नान करता ।

सर्व तीर्थे या जली येता, गुरुपदतीर्थ हेचि तत्त्वता ।।१२।।

शोषणं पापपङ्कस्य दीपनं ज्ञानतेजसाम्।
गुरुपादोदकं सम्यक संसारार्णवतारकम्।।१३।।

सद्गुरुचरणतीर्थ शोषवील पापकर्दम ।
वाढवील तेच पहा ज्ञानाचे तेज मम ।।
सागर संसाराचा याच तीर्थप्रभावे ।
उध्दरून नेईल मज गुरुभक्तिभावे ।।१३।।

अज्ञानमूलहरणं जन्मकर्मनिवारणम्।
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं गुरुपादोदकं पिबेत्।।१४।।

अज्ञान आपुले जाईल पहा समूळ ।

कर्म आणि जन्माला निवारील हे जळ ।।

वैराग्य आणि ज्ञान करण्याला सबळ ।

कंठी आपुल्या घ्यावे हे गुरुचरणजळ ।।१४।।

गुरोः पादोदकं पीत्वा, गुरोरुच्छिष्टभोजनम् ।

गुरुमूर्तेः सदा ध्यानं, गुरुमंत्रं सदा जपेत् ॥१५॥

गुरुंचे पादोदक तीर्थ प्राशून ।

गुरु उच्छिष्ट भोजन घेउन ।।

गुरुमूर्तीचे ध्यान लावून ।

गुरुमंत्र करावे साधन ।।१५।।

काशीक्षेत्रं तन्निवासो जाह्नवी चरणोदकम्।

गुरुर्विश्वेश्वरः साक्षात् तारकं ब्रह्म निश्चितम्।।१६।।

गुरुप्रासाद जाणा काशीनिवास सार्थ ।

गंगामाई तीच ती गुरुपायाचे तीर्थ ।।

गुरु तेच विश्वेश्वर जाणावे यथार्थ ।

ब्रह्म तेच गुरु तारक जाणा हा अर्थ ।।१६।।

गुरो: पादोदकं यत्तु गयाऽसौ सोऽक्षयो वट:।
तीर्थराज: प्रयागश्च गुरुमूर्ते नमो नम:।।१७।।

गयातीर्थ हे पहा गुरुचरणांचे नीर ।
अक्षय वटवृक्ष तेचि पहा गुरुवर ।।
त्यांचेच ठायी वसे तीर्थप्रयागनगर ।
सद्गुरु गुरुरायां पुन्हःपुन्हा नमस्कार ।१७।।

गुरुमूर्तिं स्मरेन्नित्यं गुरुनाम सदा जपेत्।
गुरुराज्ञां प्रकुर्वीत, गुरोरन्यन्न भावयेत्।।१८।।

आठवावे सर्वत्र सर्वकाळ गुरुमूर्तिला ।

भजावे जपध्याने सर्वदा गुरुनामाला ।।

शिरोधार्य मानावे गुरुनिर्देश आज्ञेला ।

गुरुविना अन्यत्र नसावा भाव ठेवला ।।१८।।

गुरुवक्त्रस्थितं ब्रह्म, प्राप्यते तत्प्रसादतः ।

गुरोर्ध्यानं सदा कुर्यात्, कुलस्त्री स्वपतेर्यथा ॥१९॥

गुरुवदनी असे ब्रह्माचा वास ।

त्यांच्या कृपे ते मिळे आपणास ।।

जाया जशी चिंतिते पतीस ।

तैसा गुरुचा करा सदा ध्यास ।।१९।।

स्वाश्रमं च स्वजातिं च, स्वकीर्तिपुष्टिवर्धनम् ।

एतत्सर्व परित्यज्य, गुरोरन्यन्न भावयेत् ॥२०॥

वंश कुल जात अभिमान त्यागा ।

कला कीर्ति वैभव विद्या त्यागा ।।

लोभ आस आसक्ती त्यागा ।

अनन्यतेने गुरुध्यानास लागा ।।२०।।

अनन्यश्चितयन्तो मां, सुलभ परमं पदम्।
तस्मात्सर्वप्रयत्नेन, गुरोराराधनं कुरु।।२१।।

याचि अनन्यभावाने करिती मम चिंतन ।
सहजचि प्राप्त तयां परमपदाचे निधान ।।
मम एकरूप सद्गुरुचे करा सदा भजन ।
सदैव निरंतर राहो सद्गुरुचे आराधन ।।२१।।

त्रैलोक्यस्फुटवक्तारो, देवाद्यसुरपन्नगा:।
गुरुवक्त्रस्थिता विद्या गुरुभक्त्या तु लभ्यते।।२२।।.

ख्यातकीर्त तिन्ही लोकी असुर आणि देव ।

तसेच वासुकी आदि किती वक्ते महानुभाव ।।

सद्गुरूंच्या जिव्हेवरी नांदते जी सरस्वती ।

गुरुकृपेतून केवळ ती तयांना लाभती ।।२२।।

गुकारस्त्वन्धकारश्च, रुकारस्तेज उच्यते ।

अज्ञानग्रासकं ब्रह्म, गुरुरेव न संशयः ॥२३॥

गु जाणावा अज्ञानतम । रू ज्ञान प्रकाश उत्तम ।

जो नाशितो हा तम । तो गुरूचि सगुण ब्रह्म ।।२३।।

गुकारः प्रथमो वर्णो, मायादिगुणभासकः ।

रुकारो द्वितीयो ब्रह्म, मायाभ्रान्तिविनाशनम् ॥२४॥

माया गुणांची जी खूण, तो गुकार प्रथम वर्ण ।

दुसरा जो रुकार जाण, तो ब्रह्म करी भ्रमनिरसन ।।२४ ।।

एवं गुरुपदं श्रेष्ठं, देवानामपि दुर्लभम् ।

हाहाहूहूगणैश्चैव, गन्धर्वैश्च प्रपूज्यते ॥२५॥

ऐसे श्रेष्ठ हे गुरुचरण, दुर्लभ त्यांना जे देवगण ।।

निष्ठेने हेही जे गंधर्वगण, हाहा हूहू हे पूजती चरण ।।२५।।

ध्रुवं तेषां च सर्वेषां, नास्ति तत्त्वं गुरोः परम् ।
आसनं शयनं वस्त्रं, भूषणं वाहनादिकम् ॥२६॥

सर्वत्र सदाचि सनातन, सर्वश्रेष्ठ गुरुतत्त्व जाण ।
आभरण आभूषण वाहन, शैयादि करा गुरु अर्पण ।।२६।।

साधकेन प्रदातव्यं, गुरुसंतोषकारकम् ।
गुरोराराधनं कार्यं, स्वजीवित्वं निवेदयेत् ॥२७॥

गुरूंच्या संतोषासाठी, जीव ओवाळणे श्रीगुरूंसी ।
आराधावे तयांनाचि, तन मन धने तयांसी ।।२७।।

कर्मणा मनसा वाचा, नित्यमाराधयेद्गुरुम् ।

दीर्घदण्डं नमस्कृत्य, निर्लज्जो गुरुसन्निधौ ॥२८॥

अंतःकरण कृती वाणीने, सदा रहावे गुरू आराधने ।

लोकलज्जा प्रतिष्ठा त्यागाने, गुरु नमावा दंडवते नमने ।।२८।।

शरीरमिन्द्रियं प्राणं, सद्गुरुभ्यो निवेदयेत् ।

आत्मदारादिकं सर्वं, सद्गुरुभ्यो निवेदयत् ॥२९।।

देह इंद्रिये आणि प्राण, सद्गुरूंसि करावा अर्पण ।

पुत्रपत्नी आणि आत्मा तन, त्यजुनि व्हावे गुरुशरण ।।२९।।

कृमिकीटकभस्मविष्ठा - दुर्गंधिमलमूत्रकम् ।

श्लेष्म-रक्तं त्वचा मांसं वंचयेन्न वरानने ॥३०॥

मलमूत्र रक्तमांस कृमी, दुर्गंधी अस्थीचे हे तन ।

सोडुनी त्याचा अभिमान, अर्पावे गुरूस वरानने ।।३०।।

संसारवृक्षमारूढाः पतन्तो नरकार्णवे ।

येन चैवोद्धृताः सर्वे, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३१॥

संसाराच्या जंजाळातून जे जाती नरकात ।

त्यास उध्दरती श्रीगुरु तयां नमस्कारित ।।३१।।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।

गुरुरेव परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३२॥

ब्रह्मा विष्णु महेश, श्रीगुरू त्यात प्रतीत ।

जे परब्रह्म साक्षात, तया मी नमस्कारीत ।।३२।।

हेतवे जगतामेव, संसारार्णवसेतवे ।

प्रभवे सर्वविद्यानां, शंभवे गुरवे नमः ॥३३॥

कारणीभूत अखिलजग उत्पत्तीस, सेतू जो संसारसागर तरण्यास ।।

प्रभावित तो करी सकल विद्यास, नमन जगद्गुरु श्रीशिवशंभूस ।।३३।।

अज्ञानतिमिरांधस्य, ज्ञानांजनशलाकया ।

चक्षुरुन्मीलितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३४॥

अंध जे अज्ञानरूपी तमाने, ज्ञानाचे अंजन देऊन लोचने ।।

आत्मस्वरूप तयां दाविले, तया सद्गुरूंना अनंत नमने ।।३४।।

त्वं पिता त्वं च मे माता, त्वं बंधुस्त्वं च देवता ।

संसारप्रतिबोधार्थं, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३५॥

तू माता तूच भ्राता, तूचि देवता तू तात ।

संसारनिद्रेतुनि जागण्या, सद्गुरू तुज मी नमित ।।३५।।

यत्सत्येन जगत्सत्यं, यत्प्रकाशेन भाति तत् ।

यदानंदेन नंदंति, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३६॥

जयाचे असणे येथ, तेच जगाचे कारण ।

जयाचा प्रकाश हाच, जग प्रकाशाचे कारण ।।

जो आनंदमय आनंदाचा दाता, तो सकलां सुखाचे कारण ।

तया सच्चिदानंद स्वरूपाचे, वंदितो मी श्रीगुरुचरण ।।३६।।

यस्य स्थित्या सत्यमिदं, यद्भाति भानुरूपतः ।

प्रियं पुत्रादि यत्प्रीत्या, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३७॥

अस्तित्वाने ज्याच्या जग आकारा दिसते ।

जो स्वतःच आदित्य त्याने जग प्रकाशते ।।

प्रेमामुळे ज्याच्या प्रिय मुले गणगोत होत ।

ऐशा श्री सद्गुरूला मी आता नमस्कारित ।।३७।।

येन चेतयते हीदं, चित्तं चेतयते न यम् ।

जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादि, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३८॥

जयायोगे जगता चेतना लाभे, जया प्रकाशू न शकेल चित्त ।

जागृती स्वप्न सुषुप्ती दावी, तया श्रीगुरूसी नमस्कारित ।।३८।।

यस्य ज्ञानादिदं विश्वं, न दृश्यं भिन्नभेदतः ।

सदेकरूपरूपाय, तस्मै श्रीगुरवे नमः ॥३९॥

ज्ञान सद्गुरूने देता, जाणवे शिव विश्व एकता ।

अभेद सत्य एकरूपता, तेच सद्गुरू नमिता ।।३९।।

'यस्यामतं तस्य मतं, मतं यस्य न वेद सः' ।

अनन्यभावभावाय, तस्मै श्रीगुरवे नमः ॥४०॥

जे जाणे ब्रह्म जाणण्यापार, तेचि ब्रह्मास जाणत ।

ज्यास भासे तो जाणता, तोचि असे अज्ञानात ।

गुरू न जाणती भेदभाव, शिष्यासही तेच ज्ञान देत ।

ब्रह्मवेत्ते तेचि भेदरहित, तया श्रीगुरूसी नमस्कारित ।।४०।।

यस्य कारणरूपस्य, कार्यरूपेण भाति येत् ।

कार्यकारणरूपाय, तस्मै श्रीगुरवे नमः ॥४१॥

ज्या कारणे सकल जगत, जयाचे कार्यही हेच जगत ।

कार्यकारण श्रीगुरूचि खचित, तया श्रीगुरूसी नमस्कारित ।।४१।।

नानारूपमिदं सर्वं, न केनाप्यास्ति भिन्नता ।

कार्यकारणरूपेण, तस्मै श्रीगुरवे नमः ॥४२॥

सर्वत्र पहा अभिन्नत्व, नाना आकार विश्वात ।

एकवटली ती सद्गुरूत, तया श्रीगुरूसी नमस्कारित ।।४२।।

यदंघ्रिकमलद्वंद्वं, द्वंद्वतापनिवारकम् ।

तारकं सर्वदाऽऽपद्भ्यः, श्रीगुरुं प्रणमाम्यहम् ॥४३॥

जयांचे कमलासम चरणद्वय ।

शीतोष्णादी द्वन्द्वांचा करिती क्षय ।।

निवारिती तेचि आपदा तापत्रय ।

ते सद्गुरू नमितो जोडोनि करद्वय ।।४३।।

शिवे क्रुद्धे गुरुस्त्राता गुरौ क्रुद्धे शिवो न हि ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन श्रीगुरुं शरणं व्रजेत् ।।४४।।

शिवशंकर कोपले तर रक्षिल आम्हा कोण ।
सद्गुरु गुरु तोचि त्याविना रक्षील कोण ।।
कोपता ते सद्गुरु हर न रक्षिल लेकरू ।
तर धरा हर प्रयत्ने पादपंकज श्रीगुरु ।।४४।

वन्दे गुरुपदद्वंद्वं, वाङ्मनश्चित्तगोचरम् ।
श्वेतरक्तप्रभाभिन्नं, शिवशक्त्यात्मकं परम् ॥४५॥

मन वाणी चित्त यांच्या पार, तेचि ते गुरूंचे चरणयुगुल ।

शिवशक्ति तीच श्वेतरक्त, तेच गुरू तयांसी वंदन ।।४५।।

गुकारं च गुणातीतं, रुकारं रूपवर्जितम् ।

गुणातीतस्वरूपं च, यो दद्यात्स गुरुः स्मृतः ॥४६॥

गु गुण रु रूप यांच्या पार, जे निर्गुण निराकार ।

त्याचा देई साक्षात्कार, तोचि गुरु खरोखर ।।४६।।

अ-त्रिनेत्र: सर्वसाक्षि अ-चतुर्बाहुरच्युत:।

अ-चतुर्वदनो ब्रह्मा श्री गुरु: कथित: प्रिये।।४७।।

त्यास पहा कोठे तृतिय नयन दिसेना ।

हातही चार नाही दोन बाहू असे त्यांना ।।

चार मुखे कशाला एकचि मुख पुरे ना ।

तेचि शंकर विष्णु ब्रह्मा जाण तू सद्गुरूंना ।।४७।।

अयं मयाञ्जलिर्बद्धो, दयासागरवृद्धये ।

यदनुग्रहतो जन्तुश्चित्रसंसारमुक्तिभाक् ॥४८॥

हात जोडुनि नमस्कारितो, जो दयेचा सागर तो ।

संसारातुनि तोच तारतो, कृपेसाठी त्याच्या नमितो ।।४८।।

श्रीगुरोः परमं रूपं, विवेकचक्षुषोऽमृतम् ।

मन्दभाग्या न पश्यन्ति, अन्धाः सूर्योदयं यथा ॥४९॥

विवेकदृष्टीने गुरुरूप पाहत, परमरूप तेचि अमृत ।

अंध न सूर्योदय देखत, दुर्भागी न गुरू पाहत ।।४९।।

श्रीनाथचरणद्वंद्वं, यस्यां दिशी विराजते ।

तस्यै दिशे नमस्कुर्याद्भक्त्या प्रतिदिनं प्रिये ॥५०।।

जिकडे गुरुनाथांचे चरण, त्या दिशेस प्रतिदिन ।

भक्तिभावे करावे नमन, हे देवी तिकडेच वंदन ।।५०।।

तस्यै दिशे सततमञ्जलिरेष आर्ये,

प्रक्षिप्यते मुखरितो मधुपैर्बुधैश्च ।

जागर्ति यत्र भगवान् गुरुचक्रवर्ती,

विश्वोदयप्रलयनाटकनित्यसाक्षी ॥५१॥

जागृत श्रीगुरू भगवान चक्रवर्ती, उत्पत्तिस्थितिलय जगाचा पाहती ।

ज्ञानवंत भृंग गुरुस्तवनी रती, नमस्कारिती तया हे पार्वती ।।५१।।

श्रीनाथादिगुरुत्रयं गणपतिं पीठत्रयं भैरवं,

सिद्धौघं बटुकत्रयं पदयुगं दूतीत्रयं शांभवम् ।

वीरेशाष्टचतुष्कषष्टिनवकं वीरावलीपञ्चकं,

श्रीमन्मालिनिमंत्रराजसहितं वन्दे गुरोर्मण्डलम् ॥५२॥

आदिनाथ मच्छिंद्र गोरखनाथ, गुरुमंडळा मम नमन ।

नमस्करितो मनोमनी मी, जगदाधार श्री गजानन ।

उडियान जालंधर मूलाधार, आधारमंचा मम वंदन ।

नमन माझे गुरुदेवांना, उग्ररूप भैरव तसे सिध्दगण ।

वामदेव शुक सनत्कुमार बटुगण, तयांचे वंदितो पदचरण ।

शिवदूति, काली, चामुण्डा दूति, गुरुमंडली होय गणती ।

श्रीगुरूचे सिध्दपद पूर्णपद , तयांपाशी मम पादसेवन ।
अष्टभैरव योगिनी नवनाथा, वीरेशस्वरूपा माझे नमन ।
ब्रह्मा विष्णु महेश शिव, शिवस्वरूप पंचकाला वंदन ।
श्रीमन्मालिनी मंत्रराज श्रीगुरू, गुरुमंडला नमन नमन ।।५२।।
दोन तीन पाच चौसष्ट
आठ नऊ एकरूप दृष्ट
हेच सद्गुरु मंडल हे स्पष्ट
नमन त्यांना करणे हे इष्ट ।।५२।।

(एक गणेश, दोन चरण पूर्णपद आणि सिध्दपद, तीन नाथ, तीन दूति शिवदूति, चामुण्डा व काली, पाच वीर ब्रह्मा विष्णु महेश, शिव व शिवस्वरूप, चौसष्ठ मन्त्रकर्त्या आठ योगिनी, नऊ मातृका, हे सर्व गुरुमंडल आहे)

अभ्यस्तैः सकलैः सुदीर्घमनिलैर्व्याधिप्रदैर्दुष्करैः,
प्राणायामशतैरनेककरणैर्दुःखात्मकैर्दुर्जयैः ।
यस्मिन्नभ्युदिते विनश्यति बलि वायुः स्वयं तत्क्षणात्,
प्राप्तुं तत्सहजं स्वभावमनिशं सेवध्वमेकं गुरुम् ॥५३॥

चुकता योगश्वसने होती व्यधीग्रस्त, प्राणायाम हठयोगे जे दुरापास्त ।

प्राणअपाना गुरु करिती समान, गुरुभक्ति गुरुसेवा देईल ते आत्मतत्त्व ।।५३।।

स्वदेशिकस्यैव शरीरंचिन्तनं,

भवेदनन्तस्य शिवस्य चिन्तनम् ।

स्वदेशिकस्यैव च नामकीर्तनं,

भवेदनन्तस्य शिवस्य कीर्तनम् ॥५४॥

जे स्वतःचे गुरू त्यांचे ध्यान गुरुमूर्तीचे ।

तेच चिंतन होतसे अनंतरूप शंकराचे ।।

जे स्वतःचे गुरू करिता नाम कीर्तन त्यांचे ।

ते कीर्तनही पहा स्तवन श्री शंकराचे ।।५४।।

यत्पादरेणुकणिका, कापि संसारवारिधेः ।

सेतुबंधायते नाथं, देशिकं तमुपास्महे ॥५५॥

तरण्या या संसार भव सागरातून ।

श्रीगुरूचे चरणरज हे त्याचे साधन ।।

पदरजचि आपणास होई सेतूबंधन ।

सद्गुरूचे मी सदा करी आराधन ।।५५।।

यस्मादनुग्रहं लब्ध्वा, महदज्ञानमुत्सृजेत् ।
तस्मै श्रीदेशिकेंद्राय, नमश्चाभीष्टसिद्धये ॥५६॥

अनुग्रह लाभता जयांचा, नाश महान अज्ञानाचा ।।
मार्ग आपल्या इष्टसिध्दीचा, गुरुश्रेष्ठां साष्टांग प्रणिपाताचा ।।५६।।

पादाब्जं सर्वसंसार-दावानलविनाशकम् ।
ब्रह्मरंध्रे सिताम्भोजमध्यस्थं चंद्रमण्डले॥५७॥

अकठादित्रिरेखाब्जे-सहस्त्रदल-मण्डले ।
हंसपार्श्वत्रिकोणे च, स्मरेत्तन्मध्यगं गुरुम् ॥५८॥

ब्रम्हरंध्री तालुस्थळी कमळात, जे अ क ठ वर्ण रेघात ।

हं स युक्त सहस्रदल सुशोभित, त्याच त्रिकोण स्थानात ।

तेथ श्रीसद्गुरू सदैव स्थित, पादपद्म तयांचे करितात ।

संसार वडवानला शांत, राहावे तेथ त्यांच्या ध्यानात ।।५७,५८।।

सकलभुवनसृष्टीः कल्पिताशेषपुष्टि-

र्निखिलनिगमदृष्टिः संपदां व्यर्थदृष्टिः ।

अवगुणपरिमार्ष्टिस्तत्पदार्थैकदृष्टि-

र्भवगुणपरमेष्टिर्मोक्षमार्गैक दृष्टिः ॥५९॥

सकलभुवनरंगस्थापनास्तंभयष्टिः,

सकरुणरसवृष्टिस्तत्त्वमालासमष्टिः ।

सकलमयसृष्टिः सच्चिदानंददृष्टि-

र्निवसतु मयि नित्यं श्रीगुरोर्दिव्यदृष्टिः ॥६०॥

सर्व भुवने जिच्यामुळे तीच इच्छित पुरवी ।

वैयर्थ भौतिकाचे आणि शास्त्रवेद दाखवी ।

अवगुण सर्व सारून तत् पदाकडे नेई ।

जगदाकार दृष्याचे दृष्टी ही हवन करी ।।५९।।

चौदा भुवनांच्या रंगमंचा आधार हा तिचा ।

तत्त्वज्ञानकुम्भ जी करुणा हा स्वभाव साचा ।

साधकास नेई जी सच्चिदानंद गुरूकडे ।

दिव्यदृष्टि श्रीगुरूची राहू द्यावी मजकडे ।।६०।।

अग्निशुद्धसमंतात, ज्वालापरिचकाधिया ।

मंत्रराजमिमं मन्येऽहर्निशं पातु मृत्युतः ॥६१॥

शुध्दरूपे उजळला बुध्दी ज्ञानरूप अग्नीत ।

मंत्रराज हा रक्षो मज मृत्यूतुन दिनरात ।।६१।।

तदेजति तन्नैजति, तद्दूरे तत्समीपके ।

तदन्तरस्य सर्वस्य, तदु सर्वस्य बाह्यतः ॥६२॥

गुरुतत्त्व हे गतीशील तरीही अचल असे ।

भासते ते अतिदूर तरीही समीप असे ।

तेच अंतरात सकलांच्या बाहेरही तेच असे ।

सर्वव्यापी गुरुतत्त्व हेच सर्वकाळ असे ।।६२।।

अजोऽहमजरोऽहं च, अनादिनिधनः स्वयम् ।

अविकारश्चिदानन्द, अणीयान्महतो महान् ॥६३॥

जन्म अथवा वृध्दत्व काही मज नाही,

स्वयंभू मी मज आदी वा अंत नाही ।

ज्ञानमय आनंदमय अविकारी मी,

अणूहून सान महान मज विकार नाही ।।६३।।

अपूर्वाणां परं नित्यं, स्वयंजोतिर्निरामयम् ।

विरजं परमाकाशं, ध्रुवमानन्दमव्ययम् ॥६४॥

नित्य आनंदमय अविनाशी, गुरु तेजोमय स्वप्रकाशी ।

सदैव तो जाणा युगपुरुष, गुरुतत्त्व कधी ना नाशी ।।६४।।

श्रुतिः प्रत्यक्षमैतिह्यमनुमानश्चतुष्टयम् ।

यत्स चात्मतपो वेद, देशिकं च सदा स्मरन् ॥६५॥

मननं यद्भवं कार्यं, तद्भदामि महामते ।

साधुत्वं च मया दृष्टा, त्वयि तिष्ठति सांप्रतम् ॥६६॥.

वेद इतिहास अनुमान, प्रत्यक्ष प्रमाण चतुर्मार्गाने।

जयाचे तपसामर्थ्य जाणवे, तया सद्गुरूंना स्मरणे ।।६५।।

महामते तव साधूत्व, ओळखून तुज कथितो ।

मननयोग्य जो विषय, तोचि विषद करितो ।।६६।।

अखण्डमण्डलाकारं, व्याप्तं येन चराचरम् ।

तत्पदं दर्शितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः ॥६७॥

चराचरास व्यापी जे, अखंडमंडळ ब्रह्मपद ।

तेच दाखविती भक्तांना, ते सद्गुरु तयां तू वंद ।।६७।।

सर्वश्रुतिशिरोरत्न-विराजितपदांबुजमः ।

वेदान्ताम्बुजसूर्यो यस्तस्मै श्रीगुरवे नमः ॥६८॥

ब्रह्म वर्णिती वेदवाक्ये ते मुकुटमणी ।

तेच पहा सुशोभवती गुरुचरणी ।।

वेद कमले विकसतो गुरु हाच वासरमणी ।

तया श्री सद्गुरूंना नमन पदपंकजचरणी ।।६८।।

यस्य स्मरणमात्रेण, ज्ञानमुत्पद्यते स्वयम् ।

य एव सर्वसम्प्राप्तिस्तस्मै श्रीगुरवे नमः ॥६९॥

जयाचे करिताचि स्मरण विशुध्द ध्यानी ।

त्रैलोक्याचे सम्यकज्ञान उद्भवे आपले मनी ।।

जो मूर्तिमंत भांडार जे मिळवणे त्याचा धनी ।

सकल प्राप्तीरूप त्या सद्गुरुपदी लीन वंदनी ।।६९।।

चैतन्यं शाश्वतं शान्तं, व्योमातीतं निरंजनम् ।

नादबिंदुकलातीतं, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७०॥

जो चैतन्यस्वरूप, शाश्वत, शांत, आकाशादिपेक्षा सूक्ष्म, निरंजन, नादातीत, बिंदुतीत, कलातीत आहे अशा श्रीगुरुला नमस्कार असो. ॥७०॥

श्रीगुरू चैतन्यमूर्ती शांत शाश्वतरूप ।

गगनाहून सूक्ष्म कलंकरहित रूप ।

नाद बिंदू कला अतीत ब्रह्म ते ।

त्याच्या पार सद्गुरू तयांसी नमस्ते ।।७०।।

(अनाहत नाद, शिवशक्ती मीलन आणि या दोहोंची ऊर्जा, यांच्या पलीकडे उन्मनी अवस्था म्हणजे समाधी असते.)

स्थावरं जंगमं चैव, तथा चैव चराचरम् ।

व्याप्तं येन जगत्सर्वं, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७१॥

चल अचल निसर्ग प्राणिमात्र, तसेच सजीव निर्जीव चराचर ।

व्यापिले हे सर्व जग जयाने, सद्गुरूंना त्या अनंत नमने ।।७१।।

ज्ञानशक्तीसमारूढस्तत्त्वमालाविभूषितः ।

भुक्तिमुक्तिप्रदातायस्, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७२॥

आरूढ जे आत्मज्ञानशक्तीवर, तत्त्वज्ञानमाला जयाचे अलंकार ।
धनसंपत्ति तसा मोक्ष देती वर, तया श्रीगुरुरायास नमस्कार ।।७२।।

अनेकजन्मसंप्राप्त-सर्वकर्मविदाहिने ।
स्वात्मज्ञानप्रभावेण, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७३॥

जन्मोजन्मीची जी कर्मे संचित,
श्रीगुरू करिती ती भस्मसात ।।
जयाचे आत्मज्ञाने प्रभावित,
तया श्रीगुरूंना मी नमस्कारित ।।७३।।

न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः ।
तत्त्वं ज्ञानात्परं नास्ति, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७४॥

कोणते न तत्त्व गुरुत्तत्त्वाहुनी श्रेष्ठ,
कोणते न तप गुरुसेवेहुनी श्रेष्ठ ।।
कोणते न ज्ञान तत्त्वज्ञानाहुनी श्रेष्ठ ,
नमस्कार माझा जे सद्गुरू सर्वश्रेष्ठ ।।७४।।

मन्नाथः श्रीजगन्नाथो, मद्गुरुस्त्रिजगद्गुरुः ।
ममात्मा सर्वभूतात्मा, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७५॥

मम नाथ तिन्ही जगाचे गुरु, मम त्याचि नाथा जगन्नाथा ।

अनुभूती आत्मा सर्वभूती, देई त्या नमस्कार गुरुनाथा ।।७५।।

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः, पूजामूलं गुरोः पदम् ।

मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोः कृपा ॥७६॥

आधार ध्यान करण्याला गुरूमूर्ती ।

पूजास्थान तयांच्या चरणावरती ।।

गुरुमुखातील शब्द तेच मंत्र उत्पत्ती ।

तयांची कृपा देई पहा मोक्षप्राप्ती ।।७६।।

गुरुरादिरनादिश्च, गुरुः परमदैवतम् ।

गुरोः परतरं नास्ति, तस्मै श्रीगुरवे नमः ॥७७॥

आदी तेच अनादि गुरु, तेच मूळ परमदैवत ।

स्वयंभू सर्वश्रेष्ठ गुरू, तया माझे दंडवत ।।७७।।

सप्तसागरपर्यन्त - तीर्थस्नानादिकं फलम् ।

गुरोरंघ्रिपयोबिंदुसहस्त्रांशे न दुर्लभम् ॥७८॥

सातही सागरसह तीर्थस्नान असे ।

गुरुपादतीर्थाच्या सहस्रांशही नसे ।।७८।।

हरौ रुष्टे गुरुस्त्राता, गुरौ रुष्टे न कश्चन ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन, श्रीगुरुं शरणं व्रजेत् ॥७९॥

हरी कोपता गुरु त्राता, गुरुच्या रागा सावरे कोण ।
त्यासाठी हरप्रयत्नाने, श्रीगुरूंनाच जावे शरण ।।७९।।

गुरुरेव जगत्सर्वं, ब्रह्मविष्णुशिवात्मकम् ।
गुरोः परतरं नास्ति, तस्मात्संपूजयेद् गुरुम् ॥८०॥

सर्व विश्व हेच गुरू, ब्रह्माविष्णुमहेश तेच गुरू ।
श्रेष्ठ अनन्य हेच गुरू, म्हणोनि पूजावे तेच गुरू ।।८०।।

ज्ञानं विज्ञानसहितं, लभ्यते गुरुभक्तितः ।

गुरोः परतरे नास्ति, ध्येयोऽसौ गुरुमार्गिभिः ॥८१॥

पहा साक्षात्कार आत्मज्ञान, विज्ञान लाभते गुरुभक्तिने ।

गुरुहुनि श्रेष्ठ न काही, योगियां करावी गुरुचिंतने ।।८१।।

यस्मात्परतरं नास्ति, नेति नेतीति वै श्रुतिः ।

मनसा वचसा चैव, नित्यमाराधयेद् गुरुम् ॥८२॥

श्रुति थकल्या गुरूस वर्णिता ।

नाही नाही, असे नाही, म्हणता ।

कोणी न श्रेष्ठ गुरूहून जाणता ।

वाचा मने तो आराधा नित्यता ।।८२।।

गुरोः कृपाप्रसादेन, ब्रह्मविष्णुसदाशिवाः ।

समर्थाः प्रभवादौ च, कैवल्यं गुरुसेवया ॥८३॥

गुरूच्याच कृपा प्रसादे, ब्रह्मा विष्णु महेश हे ।

स्वकार्या होती समर्थ, मुक्तिमार्ग गुरुसेवा आहे ।।८३।।

देवकिन्नरगंधर्वाः पितरो यक्षचारणाः ।

मुनयोऽपि न जानन्ति, गुरुशुश्रूषणे विधिम् ॥८४॥

देव गंधर्व पितर, किंवा यक्ष वा किन्नर ।

मुनींनाही न दृग्गोचर, गुरुपूजन विधि आचार ।।८४।।

महाहंकारगर्भेण, तपोविद्याबलान्विताः ।

संसारकुहरावर्ते, घटयंत्रे यथा घटाः ॥८५॥

जरी तप ज्ञान बल युक्त, तरी अहंकाराने युक्त ।

देहभावनेच्या रहाटात, भ्रमती ते संसार कूपात ।।८५।।

न मुक्ता देवगन्धर्वाः, पितरो यक्षकिन्नराः ।

ऋषयः सर्वसिद्धाश्च, गुरुसेवापराङ्मुखाः ॥८६॥

गुरुसेवा जे न करती, देवयक्षगंधर्व किन्नर किती ।

ऋषी सिध्द पितरा न गती, तयां कोठून मिळे मुक्ति ।।८६।।

ध्यानं श्रृणु महादेवि, सर्वानंदप्रदायकम् ।

सर्वसौख्यकरं नित्यं, भुक्तिमुक्तिविधायकम् ॥८७॥

ऐक तू महादेवी पार्वती, जये आनंद सुख प्राप्ती ।

जे देई भुक्ति मुक्ति, गुरुध्यान एकमेव जगती ।।८७।।

श्रीमत् परब्रह्म गुरुं स्मरामि, श्रीमत्परब्रह्म गुरुं वदामि ।

श्रीमत्परब्रह्म गुरुं नमामि, श्रीमत्परब्रह्म गुरुं भजामि ॥८८॥

सदा आठवावे श्री परब्रह्म गुरू ।

सदा स्तवावे श्री परब्रह्म गुरू ।।

सदा नमावे श्री परब्रह्म गुरू ।

सदा भजावे श्री परब्रह्म गुरू ।।८८।।

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं,

द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।

एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं,

भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥८९॥

मूर्तिमंत ब्रह्मानंद परमसुखाचे ते दाते ।
सुखदुःखाच्या पार, स्वयं ज्ञानस्वरूप ते ।
तत्त्वमसी महावाक्ये तयांनाच लक्षी।
निष्कलंक निश्चल तेचि बुध्दीचे साक्षी ।
गगनासम सर्वव्यापी, लेप काही नाही ।
सकल भाव भावनात गुंतणे नाही ।
सत्त्वरजतमा ऐशा गुणाच्या पार असे ।
तया सद्गुरूंना नमस्कार असे ।।८९।।

नित्यं शुद्धं निराभासं, निराकारं निरंजनम् ।
नित्यबोधं चिदानंदं, गुरुं ब्रह्म नमाम्यहम् ॥९०॥

निराकर तेच आभासरहित, नित्य शुध्द निष्कलंक ।
बोधरूप चिदानंदरूप, गुरू ब्रह्म तयां हस्तमस्तक ।।९०।।

हृदंबुजे कर्णिकमध्यसंस्थे, सिंहासने संस्थितदिव्यमूर्तिम् ।
ध्यायेद् गुरुं चंद्रकलाप्रकाशं, चित्पुस्तकाभीष्टवरं दधानम् ॥९१॥

हृदयकमलमृणाल स्थित, सिंहासनी विराजमान ।
शीतल चंद्रप्रकाशासम, आल्हादक गुरुआनन ।

ज्ञानग्रंथा करी धारण, देई अभिष्ट वरदान ।

करावे सद्गुरूमनन, गुरुमूर्तीचे सतत ध्यान ।।९१।।

श्वेतांबरं श्वेतविलेपपुष्पं, मुक्ताविभूषं मुदितं द्विनेत्रम् ।

वामांकपीठस्थितदिव्यशक्तिं, मंदस्मितं सांद्रकृपानिधानम् ॥९२॥

शुभ्र वसन शुभ्र चंदन, धारण करी शुभ्र सुमन ।

शुभ्र मौक्तिक शोभायमान, नयन दोन आनंदघन ।

दिव्य आदिशक्ति अंकी, मंदस्मितपूर्ण वदन ।

ऐशा सद्गुरूचे मनन, कृपामूर्तीचे सतत ध्यान ।।९२।।

आनंदमानंदकरं प्रसन्नं, ज्ञानस्वरूपं निजबोधयुक्तम् ।
योगींद्रमीड्यं भवरोगवैद्यं, श्रीमद्गुरुं नित्यमहं नमामि ॥९३॥

आनंदरूप आनंदाचे कारण, ज्ञानमूर्ती तेचि सदा प्रसन्न ।
आत्म बोधात रममाण, योगियांचे ते भगवान ।
स्तुतीस्तोत्रयोग्य महिमान, भव रोगाचे करिती निदान ।
वैद्यराज तेचि महान, गुरुमूर्तीचे सतत ध्यान ।।९४।।

यस्मिन्सृष्टिस्थितिध्वंस-निग्रहानुग्रहात्मकम् ।
कृत्यं पंचविधं शश्वद्भासते तं नमाम्यहम् ॥९४॥

जनन जतन संहरण, निग्रह कृपा नित्य ती ।

तया श्रीगुरुंना नमन, कृत्ये ही जेथ भासती ।।९४।।

प्रातः शिरसि शुक्लाब्जे, द्विनेत्रं द्विभुजं गुरुम् ।

वराभययुतं शांतं, स्मरेत्तं नामपूर्वकम् ॥९५॥

शिरी धवल सात्त्विक कमल, सज्ज बाहू नेत्रकमल ।

देण्या आशीष अभयदान, प्रभाते शांत गुरु नामस्मरण ।।९६।।

न गुरोरधिकं न गुरोरधिकं, न गुरोरधिकं न गुरोरधिकम् ।

शिवशासनतः शिवशासनतः, शिवशासनतः शिवशासनतः ॥९६॥

गुरुहुनि श्रेष्ठ नाही कोणी, नाही काही हीच महती ।

निश्चये सांगती शिवशंभू, त्रिवार श्रीशंकर वदती ।।९६।।

गुरुहुन कोण श्रेष्ठ, गुरुविना कोणा भक्तिभाव ।

गुरुहुन कोणाचा महिमा, त्रिवार गर्जती महादेव ।।९६।।

इदमेव शिवं त्विदमेव शिवं, त्विदमेव शिवं त्विदमेव शिवम् ।

मम शासनतो मम शासनतो, मम शासनतो मम शासनतः ॥९७॥

गुरुतत्त्व ते शिव तेचि शुभ ते क्षेमकर ।

त्रिवार निवेदितो मी, तेच शिव कल्याणकर ।।९७।।

एवंविधं गुरुं ध्यात्वा, ज्ञानमुत्पद्यतेस्वयम् ।
तत्सद्गुरुप्रसादेन, मुक्तोऽहमिति भावयेत् ॥९८॥

असे करिता गुरुध्यान, शिष्या लाभते आत्मज्ञान ।
देताच सद्गुरू कृपादान, 'मुक्त मी' याचे येई भान ।।९८।।

गुरुदर्शितमार्गेण, मनःशुद्धिं तू कारयेत् ।
अनित्यं खंडयेत्सर्वं, यत्किंचिदात्मगोचरम् ॥९९॥

निर्देशिल्या गुरुमार्गाने, शुध्दिकृत मन चित्ताने।
अनित्य मायेच्या खंडने, सकल विषया त्यागणे ।।९९।।

ज्ञेय सर्वस्वरूपं च, ज्ञानं च मन उच्यते ।
ज्ञानं ज्ञेयसमं कुर्यान्, नान्यः पंथा द्वितीयकः ॥१००॥

जे जाणणे सर्व स्वरूप, तेचि ज्ञान मन आत्मा रूप ।
मनाला करणे आत्मरूप, अनन्य तेचि साक्षात्काररूप ।।१००।।

एव श्रुत्वा महादेवि, गुरुनिंदां करोति यः ।
स याति नरकं घोरं, यावच्चंद्रदिवाकरौ ॥१०१॥

एवढे माहात्म्य ऐकूनही, जो गुरुनिंदा करु पाही ।
जोवरी चंद्रसूर्य गगनी, पार्वती तो नरकी जाई ।।१०१।।

यावत्कल्पांतको देहस्तावदेव गुरुं स्मरेत् ।
गुरुलोपो न कर्तव्य:, स्वच्छंदो यदि वा भवेत् ॥१०२॥

जोवरी न होई देहावसान, तोवरी करणे गुरुगुणगान ।
जरी जाहले आत्मभान, नच विस्मरावे गुरुस्मरण ।।१०२।।

हुंकारेण न वक्तव्यं, प्राज्ञैः शिष्यैः कथंचन ।
गुरोरग्रे न वक्तव्यमसत्यं च कदाचन ॥१०३॥

गुरूसि न करावी दुरुत्तरे, शिष्ये हुंकारादि एकेक्षरे ।
अथवा न करावे हातवारे, नच कधी असत्य उत्तरे ।।१०३।।

गुरुं त्वं कृत्य हुं कृत्य, गुरुं निर्जित्य वादतः ।

अरण्ये निर्जले देशे, स भवेद् ब्रह्मराक्षसः ॥१०४॥

एकेरीवरी हुंकारी तुच्छत्वे, अनादरे विवादता गुरूसवे ।

पाणीही न मिळे वनान्तरे, ऐसा जाई ब्रह्मराक्षसत्वे ।।१०४।।

मुनिभिः पन्नगैर्वाऽपि, सुरैर्वा शापितो यदि ।

कालमृत्युभयाद्वापि, गुरू रक्षति पार्वती ॥१०५॥

मुनी देवता सर्प जरी शापिती, गुरूच रक्षती हे देवी पार्वती।

महाकाळ मृत्यू यांची भीती, यापासून गुरूचि रक्षती ।।१०५।।

अशक्ता ही सुराद्याश्च, अशक्ता मुनयस्तथा ।

गुरुशापेन ते शीघ्रं, क्षयं यान्ति न संशयः ॥१०६॥

असे देव देवता ऋषिमुनी, गुरूपुढे असमर्थ अशक्त ।

गुरूच्या शापवाणीने फक्त, निःसंशये होती ते उध्वस्त ।।१०६।।

मंत्रराजमिदं देवि, गुरुरित्यक्षरद्वयम् ।

स्मृतिवेदार्थवाक्येन, गुरुः साक्षात्परं पदम् ॥१०७॥

मंत्रराज हाच देवी पहा, दोन अक्षरे ही "गुरू" ।

स्मृति वेद हेच कथिती, परब्रह्म साक्षात् "गुरू" ।।१०७।।

श्रुति-स्मृति अविज्ञाय, केवलं गुरुसेवकाः ।

ते वै संन्यासिनः प्रोक्ता, इतरे वेषधारिणः ॥१०८॥

न जाणता वेद श्रुति स्मृति, सेवेसी परि तत्पर गुरूप्रति ।

गुरुकृपेने संन्यासी होती, कृपाहीन ते नामधारी राहती ।।१०८।।

नित्यं ब्रह्म निराकारं, निर्गुणं बोधयेत् परम् ।

सर्वं ब्रह्म निराभासं, दीपो दीपान्तरं यथा ॥१०९॥

नित्य निर्गुण निराभास, निराकार हे ब्रह्म असे ।

बोध गुरू शिष्यास देतसे, जैसे दीप दीपा उजळतसे ।।१०९।।

गुरोः कृपाप्रसादेन, आत्मारामं निरीक्षयेत् ।

अनेन गुरुमार्गेण, स्वात्मज्ञानं प्रवर्तते ॥११०॥

गुरूच्याच कृपाप्रसादे, पहावे स्वयं आत्मारामास ।

याचि गुरूकृपा मार्गाने, आत्मज्ञान होई स्वतःस ।।११०।।

आब्रह्मस्तंबपर्यंतं, परमात्मास्वरूपकम् ।

स्थावरं जंगमं चैव, प्रणमामि जगन्मयम् ॥१११॥

परमात्मस्वरूप जे ब्रह्मादिक, अथवा तृणादि जीव अनेक ।

स्थावर जंगम चराचर लोक, तद्रूप गुरूस नम्रने अनेक ।।१११।।

वंदेऽहं सच्चिदानंदं, भेदातीतं सदा गुरुम् ।
नित्यं पूर्णं निराकारं, निर्गुणं स्वात्मसंस्थितम् ॥११२॥

पूर्णपुरुष सच्चिदानंदा, निर्गुण नित्य अभेदरूपा ।
नमितो त्या सद्गुरूला, निराकार स्थित आत्मरूपा ।।११२।।

परात्परतरं ध्येयं, नित्यमानंदकारकम् ।
हृदयाकाशमध्यस्थं, शुद्धस्फटिकसन्निभम् ॥११३॥

पराच्या पार ध्यानमूर्ती, नित्य आनंदकारणरूप ।
हृदयी ते स्फटिकसम, चिन्मय विमल गुरुरूप ।।११३।।

स्फटिकप्रतिमारूपं, दृश्यते दर्पणे यथा ।

तथात्मनि चिदाकार-मानंदं सोऽहमित्युत ॥११४॥

शुध्द स्फटिकाचे आरशात, प्रतिबिंब होत प्रतित ।

चिदानंदरूप चैतन्य मीच, भाव आत्मप्रकाशी प्रकटत ।।११४।।

अंगुष्ठमात्रपुरुषं, ध्यायतश्चिन्मयं ह्रदि ।

तत्र स्फुरती भावो यः, श्रृणु तं कथयाम्यहम् ॥११५॥

अंगठा चिन्मय आत्मा प्रतीक, त्यास ध्याता हृदयी जागृत ।

जो भाव तुज देवी मी कथित, ऐक तू देऊन एकचित्त ।।११५।।

अगोचरं तथाऽगम्यं, नामरूपविवर्जितम् ।

निःशब्दं तद्विजानीयात्, स्वभावं ब्रह्म पार्वती ॥११६॥

ज्यास नाही नामरूप, ज्ञानेंद्रियासीही न समजे ।

मौनरूपी ब्रह्म साधका, आकळे ध्यानाने गिरिजे ।।११६।।

यथा गंधः स्वभावेन, कर्पूरकुसुमादिषु ।

शीतोष्णादिस्वभावेन तथा ब्रह्म च शाश्वतम् ॥११७॥

कापूर कुसुमी परिमळ, स्वभावे ते उष्ण शीतळ ।

तैसेचि ब्रह्म चिरकाल, शाश्वत स्वभावे सर्वकाळ ।।११७।।

स्वयं तथाविधो भूत्वा, स्थातव्यं यत्रकुत्रचित् ।
कीटकभ्रमरवत्तत्र, ध्यानं भवति तादृशम् ॥११८॥

कीटक ध्याता भुंग्यासी, पावे तो भृंगरूपासी ।
तैसे ध्यासावे ब्रह्मासी, पावावे ब्रह्मरूपासी ।।११८।।

गुरुध्यानं तथा कृत्वा, स्वयं ब्रह्ममयो भवेत् ।
पिंडे पदे तथा रूपे, मुक्तोऽसौ नात्र संशयः ॥११९॥

गुरूचे ध्यान करून असे, साधक ब्रह्मपदी बसे ।
पिंड पद रूप तसे, त्यातुनि सदा मुक्त असे ।।११९।।

पार्वत्युवाच

पिंडं किंतू महादेव, पदं किं समुदाह्रतम् ।

रूपातीतं च रूपं किं, एतदाख्याहि शंकर ॥१२०॥

पार्वती म्हणे

पिंड काय पद कसे, रूप रूपातीत काय ।

विचारते पार्वती शंकरा, महादेवा हे काय ।।१२०।।

श्रीमहादेव उवाच

'पिंड' कुंडलिनीशक्तीः, 'पदं' हंसमुदाहृतम् ।

'रूपं' बिंदुरिति ज्ञेयं, 'रूपातीते' निरंजनम् ॥१२१॥

श्री महादेव वदती

देही पिंड कुंडलिनी शक्ती, एकरूप आत्मा परमात्म्याप्रती ।

तोचि हंस तयासीच जाणा पद, सोऽहं हंसः श्वसन प्राण शक्ती ।

शिव शक्ति रूप ज्यात प्रतित, तेच रूप त्यास नील बिंदू नाम ।

तिन्हीपार निष्कलंक निरंजन, परमात्मा तया रूपातीत नाम ।।१२१।।

पिंडे मुक्ता पदे मुक्ता, रूपे मुक्ता वरानने ।

रूपातीते तू ये मुक्तास्ते मुक्ता नात्र संशयः ॥१२२॥

पिंडातून मुक्त जागृत कुंडलिनी होता ।

सोऽहं पदी स्थिर हं सः अनाहते जाता ।

आत्मज्योति प्रकाशात नील बिंदू पाहता ।

निर्विकल्प निराकार निःसंशय ती मुक्तता ।।१२२।।

स्वयं सर्वमयो भूत्वा, परं तत्त्वं विलोकयेत् ।

परात्परतरं नान्यत्, सर्वमेतन्निरालयम् ॥१२३॥

स्वतःस सर्वव्यापी होता दृग्गोचर, परम तत्त्व अद्वैती ईश्वर ।
पाहता पाहणे एक साक्षात्कार, लय तेथ जे विना आधार ।।१२३।।
सर्वव्यापी सर्वत्र स्वतःस पाहुन, परमतत्त्वाचे घ्यावे दर्शन ।
अन्य काही नसे त्याच्यापार, त्यास न लागे काही आधार ।।१२३।।

तस्यावलोकनं प्राप्य सर्वसंगविवर्जितम् ।
एकाकी निःस्पृहः शान्तस्तिष्ठासेत् तत्प्रसादतः ॥१२४॥

साक्षात्कारे जया परतत्त्व दर्शन, तया सर्व इच्छांचे विसर्जन ।
मिळे अनासक्त स्थिरमन, गुरुप्रसादे परम शांतीचे स्थान ।।१२४।।

लब्धं वाऽथ न लब्धं वा, स्वल्पं वा बहुलं तथा ।

निष्कामेनैव भोक्तव्यं, सदा संतुष्टचेतसा ॥१२५॥

लाभ होता वा न होता, अल्प अथवा बहुत मिळता ।

कामनेविना भोग घेता, संतुष्ट चित्ते स्थितप्रज्ञता ।।१२५।।

सर्वज्ञपदमित्याहु-र्देही सर्वमयो बुधाः ।

सदानंदः सदा शान्तो, रमते यत्रकुत्रचित् ॥१२६॥

संतुष्ट इच्छारहित देही, तोचि सर्वज्ञ पदी राही ।

स्वस्थ तसा निरिच्छ विषयी, देह असूनि तो सर्वमयी ।

स्थितप्रज्ञ तोचि होई, सतत शांत तो राही ।

आनंदसागरी रत राही, अन्यत्र कुठे नच पाही ।।१२६।।

यत्रैव तिष्ठते सोऽपि, स देशः पुण्यभाजनम् ।

मुक्तस्य लक्षणं देवि, तवाग्रे कथितं मया ॥१२७॥

अशा मुक्ताची जेथ वसति, त्यासी पुण्यस्थळे म्हणती ।

तयांच्या लक्षणांची गणती, म्हणून देवी कथिली महती ।।१२७।।

उपदेशस्तथा देवि, गुरुमार्गेण मुक्तिदः ।

गुरुभक्तिस्तथा ध्यानं, सकलं तव कीर्तितम् ॥१२८॥

गुरूच्याच पंथे मुक्ति, गुरूध्याने करावी भक्ति ।
हीच उपदेशाची पंक्ति, कथिली तुज हे पार्वती ।।१२८।।

अनेन यद्भवेत्कार्यं, तद्भदामि महामते ।
लोकोपकारकं देवि, लौकिकं तू न भावयेत् ॥१२९॥

ऐक देवी महाबुध्दिमति , गुरुकृपेने जी कार्य पूर्ति ।
उपयोजावी उपकाराप्रति, नव्हे स्वलौकिकाप्रति ।।१२९।।

लौकिकात्कर्मणो यान्ति, ज्ञानहीना भवार्णवम् ।
ज्ञानी तू भावयेत्सर्वं, कर्म निष्कर्म यत्कृतम् ॥१३०॥

उपयोजिता सिध्दी ऐहिकास्तव, तया ज्ञानहीना संसारअर्णव ।
परि ज्ञानीयांचा सर्व कर्मभाव, निष्कर्म असाचि सिध्द होय ।।१३०।।

इदं तू भक्तिभावेन, पठते श्रृणुते यदि ।
लिखित्वा तत्प्रदातव्यं, दानं दक्षिणयासह ॥१३१॥

श्रीगुरुगीता भक्तिने ऐकणे, तिच्या लेखने वा पठणे ।
भक्तिभावे फळ मिळणे, करिता दक्षिणा दाने ।।१३१।।

गुरुगीतात्मकं देवि, शुद्धतत्त्वं मयोदितम् ।
भवव्याधिविनाशार्थ, स्वयमेव जपेत्सदा ॥१३२॥

हे शुध्दतत्त्व जी गुरुगीता, तुज कथिली मी हिमालयसुता ।
भवभय व्याधीच्या लयाकरिता, स्वये वाचे जपावी गुरुगीता ।।१३२।।

गुरुगीताक्षरैकं तु, मंत्रराजमिमं जपेत् ।
अन्ये च विविधा मंत्राः, कलां नार्हति षोडशीम् ॥१३३॥

एक एक अक्षर गुरुगीतेचे, अगाध सामर्थ्य जाण तयाचे ।
बळ अनेक अन्य मंत्रांचे, षोडशांशही तेथ नाही साचे ।।१३३

अनंतफलमाप्नोति, गुरुगीताजपेन तू ।
सर्वपापप्रशमनं, सर्वदारिद्र्यनाशनम् ॥१३४॥

दुःख दारिद्र्याचा करण्या लोप, लयास नेण्या संचित कर्म पाप ।।

सदा गुरुगीतेचा करावा जप, पुण्यफलराशी मिळे आपोआप ।।१३४।।

कालमृत्युभयहरं, सर्वसंकटनाशनम् ।

यक्षराक्षसभूतानां, चोरव्याघ्रभयापहम् ॥१३५॥

श्रीगुरुगीतेचे पहा, असे सामर्थ्य ।

काळ आणि मृत्यूचे, भय होई व्यर्थ ।।

भूत राक्षस यक्ष, भय शमनार्थ ।

भय व्याघ्र चोरांचे, हरे तेचि सामर्थ्य ।।१३५।।

महाव्याधिहरं सर्वं, विभूतिसिद्धिदं भवेत् ।

अथवा मोहनं वश्यं, स्वयमेव जपेत्सदा ॥१३६॥

करणे नित्य जप श्री गुरुगीतेचा,

तोच मार्ग व्याधीतून सुटण्याचा ।

सिध्दीदायी विभूतीच्या प्राप्तीचा,

संमोहनादि विद्या मिळवण्याचा ।।१३६।।

वस्त्रासने च दारिद्र्यं पाषाणे रोगसंभवः ।

मेदिन्यां दुःखमाप्नोति काष्ठे भवति निष्फलम् ॥१३७॥

वस्त्राच्या आसनी करता जप । उद्भवे दारिद्र्य आदिचा ताप ।
पाषाणावरि मांडता आसन । रोग व्याधी होती उत्पन्न ।
जरी भूमीच कराल आसन । दुःखचि केवळ प्राप्त जाण ।
केवळ काष्ठ उपयोगी घेता । जप निष्फळ होईल तत्त्वता ।।१३७।।

कृष्णाजिने ज्ञानसिद्धिर्मोक्षश्रीर्व्याघ्रचर्मणि ।
कुशासने ज्ञानसिद्धिः सर्वसिद्धिस्तु कंबले ॥१३८॥

होईल प्राप्त ज्ञान । आसनी घेता कृष्णाजीन ।
मोक्षप्राप्ती जपाचे फल । देतसे व्याघ्र चर्म निर्मल ।

कुशासन सर्वोत्तम आसन । ज्ञानसिध्दीचे वरदान ।

सर्वश्रेष्ठ कंबल आसन । सर्वसिध्दीचे तोचि जप कारण ।।१३८।।

कुशैर्वा दूर्वया देवि, आसने शुभ्रकंबले ।

उपविश्य ततो देवि, जपेदेकाग्रमानसः ॥१३९॥

हे देवी जपावी गुरुगीता, कुश वा दूर्वासने बैसता ।

धवल कांबळे धाबळी घेता, एकाग्रमने जपावी गीता ।।१३९।।

ध्येयं शुक्लं च शांत्यर्थं, वश्ये रक्तासनं प्रिये ।

अभिचारे कृष्णवर्ण, पीतवर्ण धनागमे ॥१४०॥

शुभ्र आसनी जपे मनःशांति, मन जिंकण्या ताम्रवर्ण ।

शत्रू जया श्याम वर्ण, धन मिळवण्या पीतवर्ण ।।१४०।।

उत्तरे शांतिकामस्तु, वश्ये पूर्वमुखो जपेत् ।

दक्षिणे मारणं प्रोक्तं, पश्चिमे च धनागमः ॥१४१॥

आग्नेय्या कर्षणं चैव , वायव्यां शत्रुनाशनम् ।

नैर्ऋत्यां दर्शनं चैव, ईशान्यां ज्ञानमेव च ॥१४२॥

मनःशांतिस उत्तरमुख, वशीकरणा पूर्वाभिमुख ।

जारणादीस दक्षिण, पश्चिममुखे जपता धन ।।१४१।।

आग्नेय सख्य आकर्षण, शत्रुनाशास वायव्य जाण ।

नैऋत्येस हे देवदर्शन, ईशान्यमुखे एकमेव ज्ञान ।।१४२।।

मोहनं सर्वभूतानां बंधमोक्षकरं भवेत् ।

देवराजप्रियकरं, सर्वलोकवशं भवेत् ॥१४३॥

गुरुगीता आवडे सर्वत्र, बंध मुक्तीचा हाचि मंत्र ।

प्रसन्न तया देवराज इंद्र, सकलांना वशी हा मंत्र ।।१४३।।

सर्वेषां स्तंभनकरं, गुणानां च विवर्धनम् ।

दुष्कर्मनाशनं चैव, सुकर्मसिद्धिदं भवेत् ॥१४४॥

मंत्रमुग्ध स्तब्ध करी , गुरुमंत्र गुणा वाढवी ।

दुष्कर्माचा नाश करी, सत्कर्माचे फल देई ।।१४४।।

असिद्धं साधयेत्कार्यं, नवग्रहभयापहम् ।

दुःस्वप्ननाशनंचैव, सुस्वप्नफलदायकम् ॥१४५॥

श्री गुरुगीता जपता होई कार्यसिध्दता ।

त्रास नवग्रहादींचा संपतो ही जपता ।।

दुःस्वप्नांचाही नाश पठता गुरुगीता ।

सुमंगल स्वप्न पूर्ति जपे येई हाता ।।१४५।।

सर्वशान्तिकरं नित्यं, तथा वंध्यासुपुत्रदम् ।

अवैधव्यकरं स्त्रीणां, सौभाग्यदायकं सदा ॥१४६॥

सदैव शांतीचे वरदान, वंध्येसही पुत्रदान ।

वैधव्याचे निरसन, सौभाग्याचे विवर्धन ।।१४६।।

आयुरारोग्यमैश्वर्य-पुत्रपौत्रप्रवर्धनम् ।

अकामतः स्त्री विधवा, जपान्मोक्षमवाप्नुयात् ॥१४७॥

लाभते दीर्घायुरारोग्य धन, तसे पुत्रादि वंशवर्धन ।

जपे गीता कामनाहीन, मोक्ष मिळे जरी पतिहीन ।।१४७।।

अवैधव्यं सकामा तु, लभते चान्यजन्मनि ।

सर्वदुःखभयं विघ्नं, नाशयेच्छापहारकम् ॥१४८॥

पतीहीना कामने श्रीगीतापठण, जन्मांतरी सौभाग्याचे दान ।

नसे दुःख भय वा विघ्न, शापादिकांचे होतसे उच्चाटन ।।१४८।।

सर्वबाधाप्रशमनं, धर्मार्थकाममोक्षदम् ।

यं यं चिंतयते कामं, तं तं प्राप्नोति निश्चितम् ॥१४९॥

सकळ बाधांची होय शांती, धर्म अर्थ काम मोक्षाची प्राप्ती ।

जे जे काम फल इच्छिती, लाभुनी जीवनी सफल होती ।।१४९।।

कामितस्य कामधेनुः, कल्पनाकल्पपादपः ।

चिंतामणिश्चिंतितस्य, सर्वमंगलकारकम् ॥१५०॥

संकल्प साधण्या कल्पवृक्ष हा, इच्छापूर्तीस्तव कामधेनु ही ।

चित्तशांति देण्या चिंतामणी हा, सर्वमंगल करी गुरुगीता ही ।।१५०।।

मोक्षहेतुर्जपन्नित्यं, मोक्षश्रियमवाप्नुयात् ॥

भोगकामो जपेद्यो वै, तस्य कामफलप्रदम् ॥१५१॥

मनी आस मोक्षप्राप्तीची, गुरुगीतापाठे प्राप्ति मुक्तिची ।

इच्छा धरिता भोगसुखाची, प्राप्ति तयाही इंद्रियसुखाची ।।१५१।।

जपेच्छाक्तश्च सौरश्च, गाणपत्यश्च वैष्णवः ।
शैवश्च सिद्धिदं देवि, सत्यं सत्यं न संशयः ॥१५२॥

शक्ति सूर्य गणपती, विष्णू वा शिवास जे भजती ।
देवी सकलां गुरुगीती, सिध्दीची होतसे प्राप्ती ।।१५२।।

अथ काम्यजपे स्थानं कथयामि वरानने ।
सागरे वा सरित्तीरेऽथवा हरिहरालये ॥१५३॥
शक्तिदेवालये गोष्ठे सर्वदेवालये शुभे ।
वटे च धात्रीमूले वा, मठे वृंदावने तथा ॥१५४॥

पवित्रे निर्मले स्थाने, नित्यानुष्ठानतोऽपि वा

निर्वेदनेन मौनेन, जपमेतं समाचरेत् ॥१५५॥

आता ऐक काम्यजपाची स्थाने, कथितो देवी वरानने ।

नदीतीर वा समुद्रतट, मंदिर विष्णू वा पंचानने ।।१५३।।

गौशाला देवळे वृंदावने, मठ देवी शक्तीची स्थाने ।

वट आवळी वृक्ष स्थाने, हे देवी शुभे तेथ सुमने ।।१५४।।

ऐसी शोधुनी निर्मल स्थाने, तेथ करावी जपाची अनुष्ठाने ।

हे देवी श्रीगुरुगीतेची पठणे, मौन धारून शांत मने ।।१५५।।

स्मशाने भयभूमौ तु, वटमूलान्तिके तथा ।

सिध्द्यन्ति धौत्तरे मूले, चूतवृक्षस्य सन्निधौ ॥१५६॥

स्मशानी वा भयंकर स्थळी, वडाच्या वा धोतऱ्याच्या तळी ।

अथवा जपावी आम्रवृक्षातळी, श्री गुरुगीता ही सर्वकाळी।।१५६।।

गुरुपुत्रो वरं मूर्खस्तस्य सिध्द्यन्ति नान्यथा ।

शुभकर्माणि सर्वाणि, दीक्षाव्रततपांसि च ॥१५७॥

लौकिकार्थे अज्ञानी मूढा, शुभ कर्मफले दीक्षा व्रत ।

जप आदी तयाचे सफल, असता तो सद्गुरूसुत ।१५७।।

संसारमलनाशार्थं, भवपाशनिवृत्तये ।

गुरुगीतांभसि स्नानं, तत्त्वज्ञः कुरुते सदा ॥१५८॥

क्षालना संसारच्या मला, भवबंधनातून सुटण्याला ।

तत्त्वज्ञानी घेती स्नानाला, श्रीगुरुकृपारूप या जला ।।१५८।।

स एव च गुरुः साक्षात्, सदा सद्ब्रह्मवित्तमः ।

तस्य स्थानानि सर्वाणि, पवित्राणि न संशयः ॥१५९॥

तोचि एक गुरू साक्षात, श्रेष्ठ तो ब्रह्म ज्ञानियात ।

गुरूचा जेथ निवास स्थित, निःसंशय पवित्र स्थान होत ।।१५९।।

सर्वशुद्धः पवित्रोऽसौ, स्वभावाद्यत्र तिष्ठति ।

तत्र देवगणाः सर्वे, क्षेत्रे पीठे वसन्ति ही ॥१६०॥

पावन पवित्र सद्गुरू जेथ, करी सहज वास्तव्य जेथ ।

सकल देव देवता तेथ, निवास त्यांचा त्या पीठात ।।१६०।।

आसनस्थः शयानो वा, गच्छँस्तिष्ठन् वदन्नपि ।

अश्वारूढो गजारूढः, सुप्तो वा जागृतोऽपि वा ॥१६१॥

शुचिष्मांश्च सदा ज्ञानी, गुरुगीताजपेन तू ।

तस्य दर्शनमात्रेण, पुनर्जन्म न विद्यते ॥१६२॥

चालता बोलता शयने, गुरुभक्त असो आसने ।

स्वार हत्ती घोड्यावरी वा, जागा वा घेरला निद्रेने ।।१६१।।

पवित्र जो गुरुगीता जपाने, सर्वदा पावन जो ज्ञाने ।

पुनर्जन्मातून होय सुटणे, तयाच्या मात्र शुभ दर्शने ।।१६२।।

समुद्रे च यथा तोयं, क्षीरे क्षीरं घृते घृतम् ।

भिन्ने कुंभे यथाकाश-स्तथात्मा परमात्मनि ॥१६३॥

दूध दुधामध्ये जसे मिसळे, अथवा जसे आप अर्णवात ।

तूप तूपात घटाकाश व्योमात, तैसा आत्मा मिळे परमात्म्यात ।।१६३।।

तथैव ज्ञानी जीवात्मा, परमात्मनि लीयते ।
ऐक्येन रमते ज्ञानी, यत्र तत्र दिवानिशम् ॥१६४॥

तसा ज्ञानवंत जीव, तो आत्मा परमात्मपदी ।
ऐक्या पावोनि रमतो, दिनरात तो आनंदपदी ।।१६४।।

एवंविधो महामुक्तः, सर्वदा वर्तते बुधः ।
तस्य सर्वप्रयत्नेन, भावभक्तिं करोति यः ॥१६५॥

सर्वसंदेहरहितो, मुक्तो भवति पार्वती ।
भुक्तिमुक्तिद्वयं तस्य, जिव्हाग्रे च सरस्वती ॥१६६॥

ऐसा जो ज्ञानी व्यवहारी, महामुक्त होवोनि विचरी ।
भावभक्ती ठेवण्या गुरूवरी, तो पूर्ण प्रयत्न करी ।।१६५।।
सर्व संशया त्यागूनि, मुक्त होई तो हे नारायणी ।
त्यास लाभे भुक्तिमुक्ति, सरस्वतीच त्याची वाणी ।।१६६।।

अनेन प्राणिनः सर्वे, गुरुगीताजपेन तू ।
सर्वसिद्धिं प्राप्नुवन्ति, भुक्तिं मुक्तिं न संशयः ॥१६७॥

असे सर्व प्राणीमात्र, जपता गुरुगीतामंत्र ।
भोग मोक्ष तयां प्राप्त, निःसंशये सिध्दीस पात्र ।।१६७।।

सत्यं सत्यं पुनः सत्यं, धर्मं सांख्यं मयोदितम् ।

गुरुगीतासमं नास्ति, सत्यं सत्यं वरानने ॥१६८॥

सत्य सत्य पुनरपि हे, धर्म ज्ञान सत्य हे ।

अनन्य गुरुगीता ही, वरानने सत्य पाही ।।१६८।।

एको देव एकधर्म, एकनिष्ठा परंतपः ।

गुरोः परतरं नान्यन्नास्ति तत्त्वं गुरोः परम् ॥१६९॥

गुरूच देव जाणा एक, गुरूच धर्म आचरा एक ।

गुरू हीच निष्ठा एक, श्रेष्ठ तपही तेच एक ।।

या जगती अन्य कोण, श्रेष्ठ असे गुरूवीण ।
कोणते तत्त्व महान, नाही दुजे या गुरूवीण ।।१६९।।

माता धन्या पिता धन्यो, धन्यो वंशः कुलं तथा ।
धन्या च वसुधा देवि, गुरुभक्तिः सुदुर्लभा ॥१७०॥

धन्य त्याची माता, धन्य त्याचा पिता ।
धन्य कुळ त्या भक्ता, वंशही धन्य गुरुभक्ता ।।
गुरुभक्तांची पुण्याई, वसुंधरेला धन्यता देई ।
हे देवी पार्वतीदेवी, गुरुमहिमा तुजसाठी गाई ।।१७०।।

शरीरमिंद्रियं प्राणश्चार्थः स्वजनबांधवाः ।

माता पिता कुलं देवि, गुरुरेव न संशयः ॥१७१॥

हे देवी हे प्राण इंद्रिय, तनू तात अथवा माय ।

बांधव कूळ आदी सर्व, गुरूरूपात सर्व निःसंशय ।।१७१।।

आकल्प जन्मना कोट्या, जपव्रततपःक्रियाः ।

तत्सर्वं सफलं देवि, गुरुसंतोषमात्रतः ॥१७२॥

कोट्यावधी जन्म कल्पांती, जप तप व्रते जी पावती ।

एक गुरूसी प्रसन्न करता, देवी ती सर्व प्राप्त तत्त्वता ।।१७२।।

विद्यातपोबलेनैव, मंदभाग्याश्च ये नराः ।

गुरुसेवां न कुर्वन्ति, सत्यं सत्यं वरानने ॥१७३॥

तप ज्ञान वा बलाने, जे अभिमानी झाले ।

गुरूसेवेसी दुरावले, ते अभागी जाहले ।।

गुरुसेवा परमकर्तव्य, याविना नाही भवितव्य ।

हे देवी हे ऐक, हेचि सत्य आहे एक ।।१७३।।

ब्रह्माविष्णुमहेशाश्च, देवर्षिपितृकिन्नराः ।

सिद्धचारणयक्षाश्च, अन्येऽपि मुनयो जनाः ॥१७४॥

ब्रह्मा विष्णु महेश किन्नर, आणि देवर्षि तसे पितर ।

यक्ष आणि सिध्द चारण, तसे अन्य मुनी जन ।

एकमेव अद्वितीय गुरूभक्ती, हे सकल जन आचरती ।

तेव्हा ती भक्तीची शक्ती, तयां त्या पदीं स्थापिती ।।१७४।।

गुरुभावः परं तीर्थमन्यतीथं निरर्थकम् ।

सर्वतीर्थाश्रयं देवि, पादांगुष्ठं च वर्तते ॥१७५॥

गुरूप्रति श्रध्दा हेचि तीर्थ, निरर्थक अन्य तीर्थ ।

आधार सर्व तीर्थांचा, देवी अंगुष्ट गुरुचरणाचा ।।१७५।।

जपेन जयमाप्नोति, चानंतफलमाप्नुयात् ।
हीनकर्म त्यजन्सर्वं, स्थानानि चाधमानि च ॥१७६॥

विजय प्राप्ति या जपे, अनंत फले या जपे ।
हीन त्याज्य कर्मत्यागे, रहावे गुरुगीताजपे ।।१७६।।

उग्रध्यानं कुक्कुटस्थं, हीनकर्मफलप्रदम् ।
गुरुगीतां प्रयाणे वा, संग्रामे रिपुसंकटे ॥१७७॥
जपते जयमाप्नोति, मरणे मुक्तिदायकम् ।
सर्वकर्म च सर्वत्र, गुरुपुत्रस्य सिद्धति ॥१७८॥

कुक्कुटवाहनदेवीचे ध्यान, हीन कर्मफलाचे दान ।
परि प्रवासे प्रस्थान, शत्रूभये गुरुगीता ध्यान ।।१७७।।
जय मिळे हा जप जपून, मरणान्ती मुक्तिचे दान ।
सकल कार्ये निर्विघ्न, सिध्द तया जो गुरुनंदन ।।।१७८।।

इदं रहस्य नो वाच्यं, तवाग्रे कथितं मया ।
सुगोप्यं च प्रयत्नेन, मम त्वं च प्रियात्विति ॥१७९॥

रहस्य हे कथिले तुज, ते सांगू नको कुणा गुज ।
हे देवी प्रिय तू मज, म्हणून गुह्य कथिले तुज ।।१७९।।

स्वाविमुख्यगणेशादिविष्ण्वादीनां च पार्वती ।

मनसापि न वक्तव्यं, सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥१८०॥

विष्णु आदी देव वा गण, हे पार्वती गजानन षडानन ।

यांसीही नको याचे कथन, कदापि नको ऐक पुनःपुनः ।।१८०।।

अतीवपक्वचित्ताय, श्रद्धाभक्तियुताय च ।

प्रवक्तव्यमिदं देवि, ममात्माऽसि सदा प्रिये ॥१८१॥

मम आत्मरूपे प्रिये वरानने, परिपूर्त जो श्रध्दा भक्तीने ।

परिपक्व पूर्ण जो चित्ताने, तया प्रसादावे उपदेशाने, ।।१८१।।

अभक्ते वंचके धूर्ते, पाखंडे नास्तिके नरे ।

मनसापि न वक्तव्या, गुरुगीता कदाचन ॥१८२॥

पाखंडी धूर्त कपटी वंचक, जया भक्ति नाही जो नास्तिक ।

मनीही नको तयाचा देशिक, तया नको कथन हेच ऐक ।।१८२।।

अभक्त नास्तिक स्वभावी, जो जनसामान्या फसवी ।

जो कपटी धूर्त मानभावी, गुरुगीता तया न सांगावी ।।१८२।।

इति श्रीस्कंदपुराणे उत्तरखंडे ईश्वरपार्वतीसंवादे गुरुगीता समाप्त ॥

श्रीगुरुदेवदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

हा स्कंदपुराणातील उत्तरखंडातील गुरुगीता नामक

ईश्वरपार्वती संवाद येथे समाप्त झाला ।।

श्री गुरुदेव दत्तात्रय चरणी समर्पित ।।

श्रीसद्गुरुनाथमहाराज की जय !

अनंत जन्मांतरीचे संचित

सद्गुरू हे लाभले कृपावंत

होण्यास प्रारब्ध प्रक्षालन

शुध्द क्रियमाणाचे पालन

यास्तव प्रर्थितो हे वरदान

सुव्रतांसी मी करितो वंदन

परमहंस सद्गुरु श्रीसुव्रतस्वामी यांचे चरणारविंदी सादर समर्पित !

श. भ. कोंडेजकर

गुरुपौर्णिमा,

आषाढ शु. १५, शके १९४८.

२९ जुलै २०२६

देवी

अथर्वशीर्ष

सप्तश्लोकी

संस्कृत+मराठी श्लोकानुवाद

शशिकांत
कोंडेजकर


हनुमानचाळीशी
मराठी अनुवाद- शशिकांत कोंडेजकर


गोंदवलेकर महाराज प्रवचने
ब्रह्मचैतन्य
शशिकांत कोंडेजकर

देवी कवच
शशिकांत कोंडेजकर


श्रीमद्भगवद्गीता
मराठी श्लोकानुवाद
शशिकांत भगवान कोंडेजकर

श्री. शशिकांत कोंडेजकर यांची सर्व पुस्तके खालील लिंकवर उपलब्ध आहेत.

अध्यात्म

https://www.esahity.com/230923432381235123662340238 12350.html

sookt_shashikant_kondejkar.pdf

https://share.google/KAIPi71ABtPLgoNF9